1 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रियाशिलता महत्त्वाची

## प्रा. डॉ. डी. आर. मोरे यांचे प्रतिपादन, वुई केअर, कॉम्पॅशन २४ तर्फे गायडन्सचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोणतीही गोष्ट अशक्य नसून, फक्त चारित्र्य, आरोग्य आणि वेळ या त्रिसुत्रीवर आयुष्य उभे करा. जगाच्या तुलनेत आपला देश तरुण आहे. विद्यार्थ्यांनी सतत क्रियाशिल राहीले पाहिजे. यातूनच व्यक्तिमत्वाचा विकास घडेल, असे प्रतिपादन बीसीयुडीचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

वुई केअर, कॉम्पॅशन २४ तर्फे शाहू स्मारक भवन मधील मिनी सभागृहामध्ये व्यक्तिमत्त्व विकास चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. फेब्रुवारी महिन्यांत यूथ ॲनिक्सचे अनावरण होणार आहे. तत्पुर्वी तरुणांना मार्गदर्शनासाठी करिअर गायडन्सचे आयोजन करण्यात आले होते. संस्थापक मिलिंद धोंड यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील १४ महाविद्यालयांतील २५ जणांचा एक गट याप्रमाणे सहभागी झाले होते. व्यक्तिमत्त्व विकासावर दुपारच्या सत्रात शुभांगी खासनीस, प्रसन्न रबाडे यांनी मार्गदर्शन केले.




**कोल्हापूर : वुई केअर, कॉम्पॅशन २४ तर्फे आयोजित चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. डी. आर. मोरे, शेजारी डावीकडून रौनक शहा, सतीश माने, मिलिंद धोंड, गौरी शिरोडकर आदी.**

मोरे म्हणाले, जागतिक दर्जाचे आपल्याकडे विद्यापीठ नाही. चांगले इंग्रजी येणे ही काळाची गरज असून, यातूनच तुमचे करिअर घडेल. शहर पोलीस उपअधीक्षक सतीश माने म्हणाले, व्यक्तिमत्व विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. आपल्या भोवतालची परिस्थिती, आकलन, यातुन व्यक्तिमत्त्व विकास घडत असतो. यूथ ॲनिक्सच्या अध्यक्षा तेजस्विनी गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद धोंड यांनी उपक्रमाची माहिती दिली. यावेळी गौरी शिरोडकर, उपाध्यक्ष सुशील रायगांधी, पूजा पवार, रितूपर्णा पाटील, ओंकार वडगावकर, सूर्यभान इनामदार, डॉ. कल्याणी कुलकर्णी, उद्योजक रौनक शहा, निकीता पिसे उपस्थित होत्या.

1 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# शिक्षणात गुणात्मक वाढ झाल्यास भारत जगाचे नेतृत्व करेल : डॉ. मोरे

## ‘सायबर’मध्ये प्राचार्यांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षणाच्या बाबतीत देश दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. शिक्षणात संख्यात्मकबरोबर गुणात्मक वाढ झाल्यास भारत जगाचे नेतृत्व करण्यास पुढे येईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

सायबर कॉलेजमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांतील प्राचार्यांसाठी ‘अचिव्हिंग इन्स्टिट्युशनल इक्सलन्स’ या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बीजभाषण करताना बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, ‘१८५७ साली तीन विद्यापीठे, २७ महाविद्यालये होती. १९४७ ला यात वाढ होऊन २० विद्यापीठे व ५०० महाविद्यालये झाली. आज ७५० विद्यापीठ व ४३ हजारांहून अधिक महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. शिक्षणक्षेत्रात स्पर्धा वाढली आहे; मात्र गुणवत्ता घसरत चालल्याची ओरड होत आहे. राष्ट्रीयस्तरावर शिक्षणाचे प्रमाण २५ टक्के आहे.

प्रास्ताविक व्ही. एस. आपटे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. पी. बी. पाटील यांनी करून दिला. यावेळी सायबरचे विश्वस्त व्ही. एम. हिलगे, डी. आर. आपटे, डॉ. एम. आर. पाटील, पी. वाय. निंबाळकर, डॉ. डी. व्ही. पाटील, डॉ. व्ही. जी. नेजदार, डॉ. जी. बी. पिष्टे आदी उपस्थित होते. दुपारच्या सत्रात सायबरचे संचालक डॉ. एम. एम. अली यांनी ‘इन्स्टियुशनल क्वॉलिटी पॉलिसी अँड इक्सलंट इन प्रेझेंटेशन’ या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. टी. व्ही. जी. शर्मा यांनी ‘ओव्हर व्ह्यू ऑफ नॅक’ या विषयावर प्राचार्यांशी संवाद साधला. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला.



**कोल्हापूर : सायबर कॉलेजमध्ये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राचार्यांसाठी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे. डॉ. एम. एम. अली, डॉ. व्ही. एस. आपटे, डॉ. जी. बी. पिष्टे. (छाया : तय्यब अली)**

1 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्राचा आर्थिक विकास शाश्वत हवा

## डॉ. एस. इंद्रकांत यांचे प्रतिपादन : विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्राचा आर्थिक विकास शाश्वत होण्यासाठी त्यामध्ये सर्व समावेशकता असली पाहिजे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आपण नक्की कोणत्या प्रकारचा विकास साधत आहोत याचा विचार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन हैद्राबाद येथील रिझर्व्ह बँक अध्यासनाचे प्रमुख प्रा. एस्. इंद्रकांत यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागामार्फत आयोजित 'बदलातून विकास : समावेशक वृध्दीसाठी वाव" या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

प्रा. इंद्रकांत यांनी पर्यावरण, प्रदूषण, सामाजिक वंचितता या विषयांना स्पर्श करत शाश्वत विकास हाच सर्वसमावेशक विकास घडवून आणू शकतो, असे सांगितले. याबरोबरच विकसित राष्ट्राच्या विकासाबद्दलच्या संकल्पनाबद्दल सुध्दा त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. देशातील मनुष्यबळाचा योग्य तो वापर करून घेतल्यास देशाची परिस्थिती निश्चितपणे बदलेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रभारी कुलगुरू प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, संख्यात्मक विकासाबरोबरच कौशल्यपूर्ण व सातत्यपूर्ण विकास ही काळाची गरज आहे. स्वातंत्र्यानंतर विद्यापीठाची संख्या २७ वरून ८०० वर तर महाविद्यालयांची संख्या ३०० वरून ३६ हजार पर्यंत पोहोचली. पण गुणवत्तेत वाढ होण्यामध्ये आपण कमी पडत आहोत. महिला व वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणल्यास भारत लवकरच विकसित देश होऊ शकेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. परिषदेचे समन्वयक प्रा. एस. एस. महाजन यांनी परिषदेच्या आयोजनामागचा हेतू स्पष्ट केला. राष्ट्राचा विकास हा सर्वांगीण, शाश्वत व सर्व समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणल्यास वेगाने होऊ शकतो. या संदर्भात चर्चा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुसऱ्या सत्रातही विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार डॉ. केदार मारूलकर यांनी मानले. यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील, डी. एस. गुरव, डॉ. बोऱ्हाडे, यांच्यासह इराण, इराक व लिबीया मधील सात प्रतिनिधींसह एकूण सुमारे शंभर प्रतिनिधी उपस्थित होते.

1 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाहीच्या अस्तित्वासाठी मतदान आवश्यक

## विश्वास नांगरे-पाटील यांचे प्रतिपादन : राष्ट्रीय मतदार जागृती दिनानिमित्त शाहू स्मारक येथे कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

व्यक्त होण्याचा मूलभूत अधिकार लोकशाहीमुळे सर्व भारतीयांना प्राप्त झाला आहे. सर्वांना प्रगतीच्या समान संधी लोकशाहीमुळे उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे लोकशाहीच्या अस्तित्वासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने जागरुकपणे मतदान करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांनी केले. राष्ट्रीय मतदार जागृती दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय निवडणूक आयोगाच्यावतीने शाहू स्मारक येथे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ.अमित सैनी होत. तर विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील हे प्रमुख पाहूणे होते.

यावेळी पोलीस अधीक्षक महादेव तांबडे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचीव डॉ.विलास नांदवडेकर, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, महापालिकेचे उपायुक्त ज्ञानेश्वर ढेरे उपस्थित होते.

यावेळी नांगरे-पाटील म्हणाले, घटनेच्या सरनाम्यामधून लोकशाहीची मूल्ये समजतात. लोकशाहीने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य व प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. लोकशाहीचे अस्तित्व टिकवायचे असेल तर प्रत्येकाने जागरुकपणे मतदान करणे गरजेचे आहे. धर्म, जात, पंथ, भाषा, प्रांत हे सर्वभेद बाजूला ठेऊन चांगल्या उमेदवाराला निवडून देणे आपले कर्तव्य आहे. समाजकंटक निवडणुकीच्या निमित्ताने सक्रिय होतात. त्यांचा बंदोबस्त पोलीस करतीलच पण त्यांच्या प्रचाराला बळी पडू नका.

जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी म्हणाले, लोकशाही अधीक बळकट करण्याची जबाबदारी युवा मतदारांवर आहे. यासाठी त्यांनी वेळेत फॉर्म भरणे, आवश्यकती सर्व कागदपत्रे फॉर्मसोबत जोडणे गरजेचे आहे. नागरिक हे प्रशासनाचे डोळे असतात. आपल्या परिसरात निवडणुकीच्या काळात कोणतेही अनुचीत प्रकार सुरू असतील तर त्याची माहिती संबंधीत यंत्रणेला देणे गरजेचे आहे. यावेळी मतदानाचा हक्का बाजावण्याची प्रतिज्ञा सर्वांना देण्यात आली. तसेच राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल पोलीस अधीक्षक महादेव तांबडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मतदार जागृतीसाठी घेतलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

### मतदान जागृती रॅली उत्साहात

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदारांमध्ये जागृतीसाठी काढण्यात आलेल्या रॅलीस बिंदू चौकातून सुरुवात झाली. अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांच्याहस्ते झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ केला. यावेळी कुलसचिव विलास नांदिवडेकर, बीसीयुडी संचालक डॉ. ए.आर.मोरे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार उत्तम दिघे, एनसीसी ऑफिसर डॉ. आर.एस.नाईक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 1 FEB 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय परिषद

## तीनशे संशोधक, शास्त्रज्ञ होणार सहभागी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागामध्ये बुधवारपासून (दि. १) दोन दिवसीय रसायनशास्त्रातील 'सृजनशील संशोधन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस देशभरातून सुमारे तीनशे संशोधकांसह नामवंत शास्त्रज्ञ परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत. रसायनशास्त्र संशोधनातील जागतिक स्तरावरील प्रचलित घडामोडी व संशोधनातील नव्या प्रवाहांची अभ्यासकांना ओळख व्हावी आणि समाजोपयोगी संशोधनास चालना मिळावी, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

पुण्यातील राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ डॉ. सतीशचंद्र ओगले, डॉ. पी. पी. वडगावकर, डॉ. सी. व्ही. रोडे, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे डॉ. रामकृष्ण भट, दिल्ली विद्यापीठातील डॉ. डी. एस. रावत, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ ई. अरुणन या परिषदेमध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

परिषदेच्या पहिल्या दिवशी सकाळी दहा वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ होईल व शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्राचार्य डी. आर. मोरे हे अध्यक्षस्थान भूषवतील. त्यानंतरच्या विविध सत्रांमध्ये प्रथितयश शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन तसेच संशोधकांचे भित्तिपत्रक व तोंडी सादरीकरण होईल.

दुसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचा सांगता समारंभ होईल. परिषदेतील आयोजित ज्ञान वृद्धिंगत करणाऱ्या कार्यक्रमांचा अभ्यासक, संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने डॉ. जी. एस. राशिनकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 FEB 2017
तरुण भारत

# 'रसायनशास्त्र'ची आज विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागामध्ये बुधवार १ ते गुरूवार २ फेब्रुवारीपर्यंत 'रसायनशास्त्रातील सृजनशील संशोधन" या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन बुधवारी सकाळी १० वाजता भाषाभवनमधील वि. स. खांडेकर सभागृहात सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन.एन. मालदार यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत, अशी माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एन. भोसले यांनी प्रसिध्द केली आहे. परिषदेमध्ये पुणे येथील राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ डॉ. सतीशचंद्र ओगले, डॉ. पी. पी. वडगावकर, डॉ. सी. व्ही. रोडे, पुणे येथील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे डॉ. रामकृष्ण भट, दिल्ली विद्यापीठातील डॉ. डी. एस. रावत, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बेंगलोर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ ई. अरुणन मार्गदर्शन करणार आहेत. देशभरातून सुमारे तीनशे संशोधकांसह नामवंत शास्त्रज्ञ या परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2017
सकाळ

# विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागात १ व २ फेब्रुवारीला रसायनशास्त्रातील सृजनशील संशोधन (Innovative Research in Chemical Sciences) राष्ट्रीय परिषद होत आहे. देशभरातून सुमारे तीनशे संशोधकांसह नामवंत शास्त्रज्ञ या परिषदेत सहभागी होणार आहेत. रसायनशास्त्र संशोधनातील जागतिक स्तरावरील प्रचलित घडामोडी व संशोधनातील नव्या प्रवाहांची अभ्यासकांना ओळख व्हावी आणि समाजोपयोगी संशोधनास चालना मिळावी, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे, असे संयोजक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 1 FEB 2017
लोकमत

# रसायन शास्त्र संशोधन परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागामध्ये आज, बुधवारी आणि उद्या (गुरुवारी) 'रसायनशास्त्रातील सर्जनशील संशोधन' ही राष्ट्रीय परिषद होणार आहे. त्यात देशातील सुमारे तीनशे शास्त्रज्ञ, संशोधक सहभागी होणार आहेत, अशी माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 FEB 2017
लोकमत

## विद्यापीठात शुक्रवारी रोजगार मेळावा

कोल्हापूर : विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, शिवाजी विद्यापीठ आणि गोखले महाविद्यालयातर्फे शुक्रवारी (दि. ३) कौशल्य व रोजगार मेळावा होणार आहे. विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत मेळावा होईल. मेळाव्यात कॅशलेस व्यवहार कसे करावेत याबाबतची माहिती, समुपदेशन व विविध कौशल्यांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठात यशवंतराव चव्हाण अध्यासनाची कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागातर्फे 'यशवंतराव चव्हाण आणि आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. चर्चासत्राचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव प्रा.डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. प्रथम सत्रात महिला आणि सद्य:स्थितीचे राजकारण या विषयावर चर्चा करण्यात आली. यामध्ये गडहिंग्लज नगराध्यक्षा स्वाती कोरी, जयसिंगपूर नगराध्यक्षा डॉ. निता माने, गडहिंग्लज नगरसेविका क्रांतीदेवी शिवणे, शशिकला पाटील, डॉ. मेघा पानसरे, यांनी आपले विचार मांडले. द्वितीय सत्रात अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे व सुधीर मोंगळे यांनी कृषी व्यवस्थेविषयी मार्गदर्शन केले.

1 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# नाईट कॉलेजमध्ये 'मुद्रितशोधन अभ्यासक्रमा'चे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स कोल्हापूरच्या मराठी विभागांतर्फे मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधित सकाळी ६ ते ८ या वेळेत अभ्यासक्रम सुरू राहणार आहे.

मराठी लेखनाविषयी नियम व मुद्रितशोधनाचे कौशल्यात्मक शिक्षण देण्यासाठी याचे आयोजन केले असून, दहावी उत्तीर्ण असणाऱ्या कोणालाही यामध्ये प्रवेश घेता येणार आहे. शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाची अभ्यासक्रमास मान्यता आहे. यामध्ये मुद्रितशोधनाची संकल्पना, स्वरूप, मराठी लेखनाविषयी नियम, व्याकरण आदी विषयी तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

तरी इच्छुकांनी प्रवेशासाठी मराठी विभागप्रमुख डॉ. अरूण शिंदे, यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे.